॥ श्री ॥
आपली भूमी.. आपला आवाज...
# वीरभूमी
संपादक : महादेव दळे

**✲ सुविचार ✲**
फसविण्यात अत्यंत सोपी व्यक्ती म्हणजे आपण स्वतः च होय.

अहिल्यानगर । मंगळवार, दि. १४ एप्रिल २०२६ । वर्ष ६ वे । अंक ३२९ वा । पाने ४ । किंमत ३ रुपये । RNI No. MAHMAR / 2012 / 47715 । 9420802145 । www.veerbhuminews.com


कर्डिले यांच्या प्रचारार्थ डॉ. सुजय विखे पाटील व आ. मोनिका राजळे यांचा प्रचार झंझावात
पान क्र. २ वर


एका महिन्यात राहता शहरातील महामार्ग पूर्ण होणार
पान क्र. ३ वर


निवडणुकीत गाफील राहिलो तर कार्यक्रम लागतो
पान क्र. ४ वर

## फोडणी

राजू घुगरे,
शेवगाव, मो. ९४२२८५६१६४

### निराशा

सुरांच्या अपूर्वाईचे
व्याकूळ असते जाणे
देह एकदा निमाल्यावर
मग पोरके होते गाणे

काळ जातो लावून
शब्द सुरांना चटका
स्वरनक्षत्र निखळते
भरल्यावर घटका

## SPOT NEWS

### ४० लाख बॅरल कच्चे तेल भारतात

● **नवी दिल्ली** – इराण आणि अमेरिका यांच्यातील शांतता चर्चा फिस्कटली आहे, त्यामुळे दोन्ही देशांमध्ये पुन्हा तणाव निर्माण झाला आहे. दोन्ही देशांकडून होर्मुझची सामुद्रधुनी बंद करण्याची घोषणा करण्यात आलेली आहे. यामुळे पुन्हा एकदा जागतिक तेल पुरवठ्याला अडथळा निर्माण होण्याची शक्यता आहे. याचा फटका भारतासह जगभरातील देशांना बसण्याची शक्यता आहे. अशातच आता या संकटाच्या काळात भारताला मोठा दिलासा मिळाला आहे. सुमारे सात वर्षांनंतर इराणचे कच्चे तेल पुन्हा भारतात दाखल झाले आहे. शिप ट्रॅकिंग डेटाच्या माहितीनुसार दोन मोठे सुपरटँकर भारताच्या पूर्व आणि पश्चिम किना-यावर पोहोचले आहेत, त्यामुळे भारताची तेलाची समस्या काही दिवसांसाठी मिटणार आहे.

### स्वरसाम्राज्ञी आशा भोसले अनंतात विलीन

● **मुंबई** – भारतीय संगीत क्षेत्रातील एक झळाळते नक्षत्र आणि कोट्यवधी रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवणाऱ्या ज्येष्ठ पार्श्वगायिका आशा भोसले यांचे रविवारी, १२ एप्रिल २०२६ रोजी वयाच्या ९२ व्या वर्षी निधन झाले. मुंबईतील शिवाजी पार्क येथे आज, सोमवारी (१३ एप्रिल) दुपारी ४ वाजता त्यांच्यावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या निधनाने भारतीय संगीतातील 'आशा' नावाचा एक सुवर्णकाळ मावळला असल्याची भावना व्यक्त होत आहे. शनिवारी रात्री छातीत संसर्ग आणि कमालीचा थकवा जाणवू लागल्याने त्यांना मुंबईतील ब्रीच कँडी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र, उपचार सुरू असतानाच रविवारी दुपारी १२ वाजून २ मिनिटांनी त्यांची प्राणज्योत मालवली.

# यंदा सरासरीपेक्षा कमी पाऊस!

## महाराष्ट्रासह देशात ९२ टक्के पावसाचा अंदाज । चिंता वाढली

● **नवी दिल्ली । वीरभूमी** –
भारतीय हवामान विभागाकडून आज नैऋत्य मान्सून २०२६ चा पहिला अधिकृत अंदाज जाहीर केला. यावर्षी देशात सरासरीच्या ९२ टक्के पाऊस पडू शकतो, असे म्हटले आहे. म्हणजेच देशात सामान्यपेक्षा कमी पावसाचा अंदाज वर्तवला आहे. पावसाचे प्रमाण जेव्हा ९० ते ९५ टक्के असते, त्यावेळी सामान्यपेक्षा कमी पाऊस पडण्याची शक्यता असते. महाराष्ट्रातदेखील सामान्यपेक्षा कमी पावसाचा अंदाज वर्तवला आहे. पृथ्वी विज्ञान मंत्रालयाचे सचिव डॉ. एम रविचंद्रन यांनी यावर्षीच्या मान्सूनचा पहिला अंदाज जाहीर केला.

पृथ्वी विज्ञान मंत्रालयाचे सचिव डॉ. एम. रविचंद्रन आणि हवामान विभागाचे महासंचालक डॉ. एम. मोहापात्रा यांच्या उपस्थितीत राजधानी दिल्लीत आज पत्रकार परिषद पार पडली. यावेळी नैऋत्य मान्सून २०२६ चा पहिला अधिकृत अंदाज जाहीर केला. यात सामान्यपेक्षा कमी पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला. जेव्हा पावसाचे प्रमाण ९० टक्के ते ९५ टक्के असते, त्यावेळी सामान्यपेक्षा कमी पावसाचा अंदाज



वर्तवण्यात येतो. दरम्यान, संपूर्ण देशभरात दीर्घावधी सरासरी ८७ सेंटीमीटर राहण्याचा अंदाज भारतीय हवामान विभागाने वर्तवला.

भारतीय हवामान विभागाने पाऊस मोजण्याच्या ५ श्रेणी ठरवल्या आहेत. सरासरीच्या ९० टक्क्यांपेक्षा कमी पाऊस म्हणजे अपुरा पाऊस समजला जातो. दुसऱ्या श्रेणीत ९० ते ९५ टक्के म्हणजे सरासरीपेक्षा कमी पाऊस तर तिसऱ्या श्रेणीत ९६ ते १०४ टक्के म्हणजे सामान्य सरासरी इतका पाऊस समजला जातो. पुढील २ श्रेणी सरासरीपेक्षा अधिक म्हणजे १०५ ते ११० टक्के आणि ११० टक्क्यांच्या पुढे अधिक पाऊस समजला जातो.

भारतीय हवामान विभागाचे महासंचालक डॉ. एम. मोहापात्रा यांच्या माहितीनुसार जून, जुलै, ऑगस्टपर्यंत पावसाची स्थिती सामान्य राहणार आहे. त्यातच जुलै, ऑगस्ट, सप्टेंबर महिन्यात एल निनो परिस्थिती असणार आहे. त्याचवेळी जुलै, ऑगस्ट, सप्टेंबरमध्ये भारतीय समुद्रात सकारात्मक परिस्थिती असल्याची माहिती डॉ. एम. मोहापात्रा यांनी दिली. एल निनोच्या नकारात्मक परिणामाला भारतीय समुद्रातील सकारात्मक परिस्थिती अनुकूल करेल. त्यामुळे एल निनोचा परिणाम जाणवणार नाही, असे डॉ. एम. मोहापात्रा यांनी सांगितले.

यंदा मान्सून सरासरीपेक्षा कमकुवत राहण्याची शक्यता वर्तविली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. भारतीय अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने हा अंदाज अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. मागच्या काही वर्षांत चांगला पाऊस होत आला आहे. परंतु यंदाच्या अंदाजात सरासरीपेक्षा कमी पाऊस पडण्याची शक्यता वर्तविल्याने चिंता वाढली आहे.

# गोदा ते नर्मदा या पुण्यश्लोक अहिल्यादेवी जलयात्रा २०२६ उपक्रमाचा शुभारंभ त्र्यंबकेश्वर आणि चोंडी येथून होणार

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस । अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंती निमित्त आयोजन

● **मुंबई । वीरभूमी**–
गोदा ते नर्मदा या पुण्यश्लोक अहिल्यादेवी जलयात्रा २०२६ चा शुभारंभ त्र्यंबकेश्वर आणि चोंडी येथून कार्यक्रमाद्वारे केला जाईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त त्यांचे कार्य, विचार व वारसा नागरिकांपर्यंत पोहचविण्यासाठी २५ ते २९ एप्रिल २०२६ या कालावधीत या जलयात्रेचे आयोजन करण्यात येणार आहे.




गोदा ते नर्मदा या जलयात्रेबाबत मंत्रालयात सादरीकरण करण्यात आले. यावेळी मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. यावेळी जलसंपदा मंत्री (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) राधाकृष्ण विखे पाटील, जलसंपदा (विदर्भ, तापी, कोकण पाटबंधारे विकास महामंडळ) व आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन, जलसंपदा विभागाचे अपर मुख्य सचिव दीपक कपूर, मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्रा , जलसंपदा लाभक्षेत्र विकास सचिव संजय बेलसरे, जलसंपदा विभागातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, अहिल्यादेवींची जन्मभूमी चोंडी महाराष्ट्रात असून त्यांचा प्रभावी सांस्कृतिक वारसा महाराष्ट्राशी जोडलेला आहे. अहिल्यादेवींच्या कार्यातील सुशासन, महिला नेतृत्व, लोककल्याण, जलदृष्टी, वारसा संवर्धन यासाठी राष्ट्रीय मूल्ये महत्त्वपूर्ण आहे. राज्य शासनाकडून त्याचे स्मरण करताना हा उपक्रम या जलयात्रेच्या निमित्ताने राबविला जाणार आहे.

२५ एप्रिल २०२६ रोजी अहिल्यादेवींचे जन्मगाव चोंडी आणि नाशिक जिल्ह्यातील त्र्यंबकेश्वर येथून यात्रांचा शुभारंभ होईल आणि या यात्रांचा संगम शिर्डी येथे होणार असून तेथून छत्रपती संभाजी नगर घृष्णेश्वर, धुळे या मार्गाने इंदूर येथे २९ एप्रिल रोजी समारोप होईल. या जलयात्रेदरम्यान विविध कार्यक्रम व उपक्रम जलयात्रेच्या मार्गावरील गावांमध्ये आणि शहरात होणार आहेत. लघु कालव्यांचे जाळे उभारणे, पाणी साठवण आणि जलसंवर्धन, शेतीपूरक विकास, स्थानिक रोजगार आणि कुटीर उद्योगांना चालना हे अहिल्यादेवींचे जलसंवर्धनातील कार्य प्रेरणास्त्रोत आहे. अहिल्यादेवींनी हे तत्त्व २५०-३०० वर्षांपूर्वी आचरणात आणले होते. अहिल्यादेवींनी गरीब, वंचित, शेतकरी आणि सामान्य जनतेला केंद्रस्थानी ठेवून शासन केले. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी अहिल्यादेवींच्या कार्याचा गौरव केला असून या कालावधीत विविध उपक्रम देशभरात आयोजित करण्यात आले आहेत. यामध्ये स्मारक नाणे व टपाल तिकीट प्रकाशन, महिला सक्षमीकरण, सुशासन व वारसा संवर्धनाशी निगडित उपक्रम, प्रदर्शने, प्रकाशने, परिसंवाद, सांस्कृतिक कार्यक्रम. विविध राज्ये, संस्था यांच्यावतीने विविध कार्यक्रम राष्ट्रीय स्तरावर आयोजन केले गेले आहे.

# मुख्यमंत्री सहाय्यता निधीची नवीन ऑनलाईन प्रणाली होणार सुरू : मदत आणि उपचाराला मिळणार गती

## आता रुग्णाऐवजी थेट रुग्णालयामार्फत अर्ज सादर करता येणार

● **मुंबई । वीरभूमी**–
राज्यातील गरजू आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील रुग्णांना उपचारासाठी आर्थिक सहाय्य अधिक वेगात मिळणार आहे. मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाची अद्यावत ऑनलाईन प्रणाली सुरू होणार आहे. या प्रणालीमुळे अर्ज मंजुरीची प्रक्रिया कार्यालयीन ८ तासांत पूर्ण होणार आहे. विशेष म्हणजे आता रुग्णाऐवजी थेट कक्षाशी संलग्न असणाऱ्या रुग्णालयामार्फत अर्ज सादर होणार आहेत. त्यामुळे रुग्णाला कोणत्याही प्रकारचा अर्ज भरावा लागणार नाही. त्यामुळे उपचार प्रक्रियेला गती मिळणार आहे. या प्रणालीचे येत्या काही दिवसातच राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उदघाटन करण्यात येणार आहे अशी माहिती मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रूग्णालय मदत कक्षा कडून देण्यात आली आहे.




गेल्या काही वर्षभरापासून मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षामध्ये नावीन्य पूर्ण रुग्णस्नेही बदल करण्याचे काम सुरु आहे. त्याचाच एक भाग मुख्यमंत्री सहाय्यता निधीची नवी ऑनलाईन प्रणाली असणार आहे. रुग्णाने रुग्णालयात सर्व रीतसर कागदपत्रे दिल्यानंतर रुग्णालय प्रशासन त्याचा अर्ज मुख्यमंत्री सहायता निधी कार्यालयाकडे मंजुरीसाठी पाठविणार आहे. त्या ठिकाणी नियमानुसार सर्व कागदपत्रे असल्यास अर्ज मंजुरीची प्रक्रिया कार्यालयीन ८ तासांत पूर्ण होणार आहे. यामुळे रुग्ण आणि त्याच्या नातेवाईकाला मोठा दिलासा मिळणार आहे. तसेच, गेल्या आर्थिक वर्षात १ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत राज्यातील तब्बल ४० हजार ७७६ रुग्णांना ३३३ कोटी ६ लाख ८१ हजार ५०० रुपयांची वैद्यकीय मदत देण्यात आली आहे.

मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रूग्णालय मदत कक्षाचे कक्षप्रमुख रामेश्वर नाईक म्हणाले की, रुग्णांना वेळेत उपचार मिळावेत, यासाठी ही ऑनलाईन प्रणाली विकसित करण्यात येत आहे. यामुळे आता अर्ज मंजुरीची प्रक्रिया जलद होऊन रुग्णांना मोठा दिलासा मिळणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते या नवीन प्रणालीचे अधिकृत उद्घाटन लवकरच होणार असून, त्यानंतर राज्यभरात ती प्रभावीपणे राबवण्यात येणार आहे. अधिक माहितीसाठी गरजू रूग्णांनी १८०० १२३ २२११ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा.

# ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी डिजिटल शिक्षण काळाची गरज

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस । कर्जत – जामखेडमधील १४० शाळांमध्ये सभापती प्रा. राम शिंदे यांच्या पुढाकाराने डिजिटल शैक्षणिक साहित्याचे लोकार्पण

● **अहिल्यानगर । वीरभूमी**–
शिक्षणात तंत्रज्ञानाचा व्यापक वापर करून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना भविष्यातील स्पर्धात्मक जगासाठी सक्षम करणे हे राज्य शासनाचे मुख्य उद्दिष्ट आहे. विद्यार्थ्यांना डिजिटल शिक्षण उपलब्ध करून देणे ही काळाची गरज बनली आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

कर्जत - जामखेड तालुक्यातील १४० जिल्हा परिषद शाळांसाठी डिजिटल शैक्षणिक साहित्याचा लोकार्पण सोहळा आज पार पडला. या कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे दूरसंवाद प्रणालीद्वारे सहभागी झाले होते. जामखेड येथील तापनेश्वर जिल्हा परिषद शाळेत विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे उपस्थित होते. यावेळी जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, शालेय शिक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव वेणुगोपाल रेड्डी, ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी तसेच शिक्षक, विद्यार्थी, पालक आणि ग्रामस्थ दूरसंवाद प्रणालीद्वारे सहभागी झाले होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी स्थानिक विकास निधीतून कर्जत व जामखेड तालुक्यातील जिल्हा परिषद शाळांच्या आधुनिकीकरणावर भर दिला आहे. हा प्रकल्प ग्रामीण व शहरी भागातील शिक्षणातील दरी कमी करण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरेल. शिक्षकांनी तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून आपल्या अध्यापन कौशल्यात वाढ करावी आणि विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण द्यावे, असे आवाहन त्यांनी केले.

या साधनांच्या उपलब्धतेमुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित दर्जेदार शिक्षण मिळणे अधिक सुलभ होणार आहे. दृक्-श्राव्य माध्यमांच्या वापरामुळे वर्गातील शिक्षण प्रक्रिया अधिक संवादात्मक व प्रभावी होईल. त्यामुळे अवघड विषय समजणे सोपे होईल. या आधुनिकीकरणामुळे स्थानिक विद्यार्थ्यांचा शैक्षणिक सहभाग वाढेल आणि त्यांच्या सर्वांगीण प्रगतीला गती मिळेल, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी नमूद केले.

सभापती प्रा. राम शिंदे म्हणाले की, ग्रामीण व शहरी भागातील शैक्षणिक गुणवत्तेतील तफावत दूर करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणे ही काळाची गरज आहे. नवीन डिजिटल साधनांमुळे विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाविषयी आवड निर्माण होऊन शिक्षण प्रक्रिया अधिक रंजक व सुलभ होईल. तंत्रज्ञानाच्या मदतीने ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी आपले आत्मबळ वाढवावे, जेणेकरून ते स्पर्धा परीक्षा, विज्ञान व तंत्रज्ञान अशा विविध क्षेत्रांत जागतिक स्तरावर आत्मविश्वासाने यश मिळवू शकतील.

शिक्षकांनी डिजिटल साधनांचा केवळ वापर न करता त्या माध्यमातून अध्यापन पद्धतीत मूलभूत बदल घडवून आणावेत. विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेला वाव देत शिक्षण प्रक्रिया तणावमुक्त कशी करता येईल, याकडे विशेष लक्ष देणे आवश्यक आहे. शिक्षकांचे प्रभावी मार्गदर्शन आणि अत्याधुनिक सुविधा यांच्या संगमातून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेत मोठी झेप घेण्याची क्षमता निर्माण होईल. विद्यार्थ्यांचा अभ्यासातील सहभाग वाढवण्यासाठी शिक्षकांनी या सुविधांचा सातत्याने प्रभावी उपयोग करावा, असे आवाहनही त्यांनी केले.



विद्यार्थ्यांनी आयुष्यात मोठी स्वप्ने पाहून ती पूर्ण करण्यासाठी जिद्द, चिकाटी आणि सतत ज्ञान संपादनाची वृत्ती जोपासावी. केवळ शालेय अभ्यासक्रमापुरते मर्यादित न राहता जागतिक स्तरावरील ज्ञानाशी जोडले जाण्यासाठी या सुविधांचा उपयोग करावा. पालकांनीही आपल्या पाल्यांच्या प्रगतीत सक्रिय सहभाग नोंदवून त्यांना प्रोत्साहन द्यावे. भविष्यात हे विद्यार्थी वैचारिकदृष्ट्या प्रगल्भ होऊन शहरातील विद्यार्थ्यांच्या तोडीस तोड यश संपादन करतील, अशी अपेक्षाही सभापती प्रा. राम शिंदे यांनी व्यक्त केली.

जामखेड येथील तापनेश्वर जिल्हा परिषद शाळेत नगराध्यक्षा प्रांजल चिंतामणी, उपनगराध्यक्ष पोपट राळेभात, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) भास्कर पाटील यांच्यासह शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी वेणुगोपाल रेड्डी, एकनाथ डवले आणि डॉ. पंकज आशिया यांनीही आपले विचार मांडले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार प्रदर्शन आनंद भंडारी यांनी केले.

कार्यक्रमात शैक्षणिक साहित्याचे वितरण प्रा. राम शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आनंद व उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, शिक्षकांनीही समाधान व्यक्त केले. या कार्यक्रमास विविध विभागांचे अधिकारी, मुख्याध्यापक, शिक्षक, विद्यार्थी, पालक तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# SPOT NEWS

## श्री हरिहर गोविंद आश्रमात पंचदिनी किर्तन महोत्सव

**● कोपरगाव । वीरभूमी –**




तालुक्यातील श्रीक्षेत्र शिंगवे येथे श्रीहरिहर मंदिराच्या प्रथम वर्धापण दिना निमित्ताने योगीराज सद्गुरु गंगागिरी महाराज, स्वा. सु. जोग महाराज व ब्र. सद्गुरू सिद्धयोगी गोविंदगिरी बाबा यांच्या कृपा आशिर्वादाने व ह.भ.प. आचार्य भगवान महाराज शास्त्री यांच्या मार्गदर्शनाखाली पंचदिनी भव्य किर्तन महोत्सव आयोजीत करण्यात आला आहे, अशी माहिती ग्रामस्थांनी दिली आहे. दिनांक १४/४/२०२६ ते २०/४/२०२६ पर्यंत होणाऱ्या कार्यक्रमात रोज सकाळी ५ ते ७ काकड आरती, ८ ते १२ श्री ज्ञानेश्वरी पारायण, सायं. ७ ते ९ या वेळेत किर्तन व महाप्रसाद. होणार असून सदर प्रसंगी ह.भ.प. महंत हरिशरण गिरीजी महाराज, ह.भ.प. परमहंस महंत काशीकानंद गिरीजी महाराज, ह.भ.प. महंत प्रकाशानंद गिरीजी महाराज, ह. भ. प. महंत भगवान महाराज जंगले शास्त्री यांची कीर्तने होणार आहेत. तसेच २०/४/२०२६ रोजी सायंकाळी पाच वाजता ह.भ.प. हिंदुधर्म रक्षक महंत रामगिरीजी महाराज, गोदावरीधाम बेट सराला यांच्या काल्याच्या किर्तनाने सप्ताहाची सांगता होणार आहे. पंचक्रोशीतील सर्व भक्त परिवाराने उपस्थित राहुन या कार्यक्रमाची शोभा वाढवावी व ज्ञानामृत व महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन श्री हरिहर गोविंद आश्रमाच्या वतीने, समस्त ग्रामस्थांच्या वतीने आचार्य भगवान महाराज शास्त्री यांनी केले आहे.

## कामगारांना पगार व पीएफ न मिळाल्याने शिव राष्ट्र सेनेचा आंदोलनाचा इशारा



**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

शिव राष्ट्र सेनेचे संस्थापक व राष्ट्रीय अध्यक्ष श्री. संतोष नवसूपे यांच्या नेतृत्वाखाली अहिल्यानगर महानगर पालिका कार्यालयात आयुक्तांना निवेदन सादर करण्यात आले. या निवेदनात नमूद करण्यात आले की, महानगरपालिकेत आरोग्य वर्धिनी, सिक्युरिटी, शिपाई तसेच इतर कामगारांना ठेकेदार पद्धतीने कामावर ठेवण्यात आले असून ऑक्टोबर २०२३ पासून आजपर्यंत या कामगारांना पगार व पीएफ मिळालेला नाही. कामगारांनी वारंवार ठेकेदारांकडे विनंती करूनही त्यांना उडवाउडवीची उत्तरे देण्यात येत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. संबंधित कामगार हे सर्वसामान्य व गोरगरीब कुटुंबातील असून, घरगुती जबाबदाऱ्या, मुलांचे शिक्षण तसेच आजारी आई-वडिलांच्या उपचारांसाठी त्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. मात्र ठेकेदार व प्रशासन याकडे दुर्लक्ष करत असल्याचेही निवेदनात सांगण्यात आले. न्यायासाठी कामगारांनी शिव राष्ट्र सेनेकडे धाव घेतली असून, संघटनेने त्यांच्या प्रश्नाला पाठिंबा दिला आहे. यावेळी बोलताना अध्यक्ष श्री. संतोष नवसूपे यांनी सांगितले की, महानगरपालिकेतील ठेकेदार पद्धतीने काम करणाऱ्या कामगारांवर अन्याय होत असून, त्यांच्या हक्काचा पगार व पीएफ रोखून ठेवणे ही अत्यंत गंभीर बाब आहे. हे कामगार दिवस-रात्र प्रामाणिकपणे सेवा देत आहेत, तरीही त्यांना त्यांच्या मेहनतीचा मोबदला मिळत नाही, ही अत्यंत दुर्दैवी गोष्ट आहे. शिव राष्ट्र सेना ही नेहमीच सर्वसामान्य, गोरगरीब व गरजू लोकांच्या पाठीशी ठामपणे उभी राहिली आहे. या कामगारांना न्याय मिळवून देण्यासाठी आम्ही शेवटपर्यंत लढा देऊ. प्रशासनाने तात्काळ याची दखल घेऊन संबंधित ठेकेदारांवर कारवाई करून कामगारांचे थकीत पगार व पीएफ त्वरित अदा करावे. अन्यथा शिव राष्ट्र सेना महापालिकेसमोर तीव्र आंदोलन छेडण्यास मागेपुढे पाहणार नाही.

### भाजपाचे उमेदवार अक्षय कर्डिले यांच्या प्रचारार्थ

# डॉ. सुजय विखे पाटील व आ. मोनिका राजळे यांचा प्रचार झंझावात

**● तिसगाव । वीरभूमी –**

राहुरी-नगर-पाथर्डी मतदारसंघातील पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय वातावरण चांगलेच तापले असून भारतीय जनता पार्टी महायुतीचे अधिकृत उमेदवार अक्षय कर्डिले यांच्या प्रचारार्थ मिरी, लोहसर व तिसगाव परिसरातील प्रमुख कार्यकर्त्यांची बैठक उत्साहात पार पडली. या बैठकीत भाजपा प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील व आ. मोनिका राजळे यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले.

एखाद्या लोकप्रिय नेत्याच्या दुर्दैवी निधनानंतर पोटनिवडणूक बिनविरोध करण्याची जिल्ह्यात परंपरा असताना, यावेळी विरोधकांनी राजकारण करत निवडणूक लादली, ही दुर्दैवी बाब असल्याची टीका डॉ. विखे पाटील यांनी केली. बारामतीला एक न्याय आणि राहुरीला दुसरा न्याय का? असा सवाल उपस्थित करत त्यांनी अप्रत्यक्षपणे शरद पवार यांच्यावर निशाणा साधला.

बैठकीत बोलताना डॉ. विखे पाटील म्हणाले की, जो पाणी देईल, त्यालाच निवडून द्या. वांबोरी चारीचे पाणी प्रत्येक शेतकऱ्याच्या शेतापर्यंत पोहोचले पाहिजे, हीच आमची भूमिका आहे. जिरायत भागाला पाणी मिळवून देणे, विकासाच्या मुख्य प्रवाहात आणणे आणि शेतकऱ्यांच्या आयुष्यात सकारात्मक बदल घडवणे हेच आपले




ध्येय असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

३९ गावांसाठी महत्त्वपूर्ण असलेल्या वांबोरी पाणी योजनेचा पहिला टप्पा पूर्ण झाला असून दुसऱ्या टप्प्याचे काम वेगाने सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, स्वर्गीय शिवाजीराव कर्डिले आणि आमदार मोनिका राजळे यांच्या माध्यमातून या भागात पाणी पोहोचवण्याचे काम सुरू असल्याचे त्यांनी नमूद केले.

स्व. कर्डिले साहेबांनी ३९ गावांमध्ये राबवलेली विकासकामे, लोकांशी ठेवलेला जिव्हाळा व प्रत्येकाच्या सुख-दुःखात दिलेला आधार याची आठवण करून देत, ही निवडणूक स्वतःची समजून कार्यकर्त्यांनी काम करावे, असे आवाहन करण्यात आले. २३ तारखेला सकाळी ७ ते सायंकाळी ६ या वेळेत होणाऱ्या मतदानात ९५ टक्क्यांहून अधिक मतदान घडवून आणण्याची जबाबदारी प्रत्येक कार्यकर्त्याने घ्यावी, असे त्यांनी सांगितले.

'माझं बूथ माझी जबाबदारी' या भावनेतून प्रत्येक कार्यकर्त्याने आपल्या गावात सक्रिय राहावे, असे आवाहन करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली मतदारसंघात मोठ्या प्रमाणात विकासकामे झाली असून ही विकासाची गती कायम ठेवण्यासाठी अक्षय कर्डिले यांना विक्रमी मताधिक्याने विजयी करा, असे आवाहन त्यांनी केले.

गेल्या अनेक वर्षांत कर्डिले साहेबांनी ३९ गावांमध्ये मोठ्या प्रमाणावर विकासकामे केली असून प्रत्येकाच्या सुख-दुःखात त्यांनी कायम लोकसंपर्क ठेवला. वांबोरी पाणी योजनेचा पहिला व दुसरा टप्पा, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना, सभामंडप उभारणी यांसारख्या अनेक विकासकामांतून या भागाला दिशा मिळाली आहे. ग्रामपंचायत स्तरापासून ते सहकार क्षेत्रातील विविध पदांच्या माध्यमातून त्यांनी ग्रामीण भागाच्या प्रगतीसाठी मोठे योगदान दिले. या सर्व कामांची जाणीव ठेवून प्रत्येक कार्यकर्त्याने एकजुटीने काम करत अक्षय दादा कर्डिले यांना मोठ्या मताधिक्याने विजयी करण्याचा निर्धार करावा, असे आवाहन आमदार मोनिका राजळे यांनी केले.

या बैठकीला आमदार मोनिका राजळे यांच्यासह भाजपा महायुतीचे पदाधिकारी, सरपंच, सोसायटीचे पदाधिकारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी एकमुखाने अक्षय कर्डिले यांच्या विजयासाठी जोरदार काम करण्याचा निर्धार व्यक्त केला.

## जबरदस्तीने पुजा साहित्याची विक्री करणाऱ्या तिघांविरोधात गुन्हा दाखल

**● पाथर्डी । वीरभूमी –**

मोहटादेवी दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना अडवून पूजेचे साहित्य जबरदस्तीने खरेदी करण्यास भाग पाडणाऱ्या तिघांविरोधात पाथर्डी पोलिसांनी गुन्हा दाखल करून त्यांना ताब्यात घेतले आहे.

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, दि.१२ एप्रिल रोजी दुपारी सुमारे ३ वाजण्याच्या सुमारास मोहटा देवी कमान परिसरात काही इसम भाविकांच्या चारचाकी वाहनांना मोटारसायकल आडवी लावून अडवत असल्याची गुप्त माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पोलीस निरीक्षक पुजारी यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. तेथे सचिन अंबादास दहिफळे (वय १८), संदिप महादेव दहिफळे (वय ४१, दोघे रा. मोहटे) व गणेश विष्णू धायतडक (वय २५, रा. धायतडकवाडी) हे तिघे भाविकांच्या वाहनांना अडवून पूजेचे साहित्य आमच्या दुकानातूनच घ्यावे, असा दबाव टाकत असल्याचे निदर्शनास आले. पोलिसांनी तिघांना ताब्यात घेऊन पोलीस ठाण्यात आणले. याबाबत पोलीस कॉन्स्टेबल सचिन हाडके यांच्या फिर्यादीवरून तीन जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, मोहटा देवी दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना अशा प्रकारचा त्रास होत असल्याच्या तक्रारी सातत्याने पुढे येत होत्या. काही प्रकरणांमध्ये भाविक व स्थानिक दुकानदारांमध्ये वाद होऊन हाणामारीचे प्रकारही घडल्याचे समोर आले आहे.

याबाबत काही दिवसांपूर्वी बीड जिल्ह्यातील सामाजिक कार्यकर्ते विनोद चव्हाण यांनी सोशल मीडियावर वास्तवदर्शी पोस्ट शेअर करत प्रशासनाचे लक्ष वेधले होते. त्यांच्या पोस्टमध्ये हायवेवर गाड्या अडवणे, फोटो देऊन ग्राहक फिक्स करणे तसेच पूजेच्या साहित्याच्या नावाखाली जादा दर आकारण्याचे प्रकार उघडकीस आणले होते. या पार्श्वभूमीवर पाथर्डी पोलिसांनी विशेष मोहीम हाती घेत कारवाई सुरू केली आहे. भाविकांना कोणत्याही प्रकारचा त्रास होऊ नये व मंदिर परिसरात शिस्त राखली जावी, यासाठी पोलिसांकडून पुढील काळातही अशी कारवाई सुरू राहणार असल्याचे सांगण्यात आले. भाविकांनीही सावध राहून कोणत्याही प्रकारच्या जबरदस्तीला बळी पडू नये, तसेच अशा प्रकारांची माहिती पोलिसांना द्यावी, असे आवाहन करण्यात आले असून, अशी मोहीम सातत्यपूर्ण राबवण्यात येणार असल्याचे पोलिस निरीक्षक विलास पुजारी सांगून यापुढे भाविकांना कोणी त्रास दिल्यास गुन्हा दाखल करण्याचा इशाराही पुजारी यांनी दिला आहे.

## सेवानिवृत्त वाहतूक नियंत्रकाच्या मुलाची टॅक्स असिस्टंट पदावर निवड

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

एसटी महामंडळातील सेवानिवृत्त वाहतूक नियंत्रक दत्तू शेळके यांचा मुलगा प्रविण शेळके याने महाराष्ट्र लोकसेवा आयोग (एमपीएससी) परीक्षेत उल्लेखनीय यश मिळवत टॅक्स असिस्टंट पदावर निवड मिळवली आहे. त्यांच्या या यशाबद्दल राज्य परिवहन निवृत्त कर्मचारी संघटनेच्या वतीने विशेष सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमात खा. निलेश लंके यांच्या हस्ते प्रविण शेळके यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी संघटनेचे माजी जिल्हाध्यक्ष व केंद्रीय कार्यकारिणी सदस्य बलभीम कुबडे, प्रतिनिधी मच्छिंद्र शिंदे, मोहन औटी, आप्पासाहेब सुंबे तसेच दत्तू शेळके यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

खा. निलेश लंके म्हणाले की, प्रविण शेळके यांचे यश हे केवळ वैयक्तिक नाही, तर समाजासाठी मार्गदर्शक ठरणारे आहे. अत्यंत सामान्य घरातून येऊन त्यांनी ज्या प्रकारे मेहनत आणि जिद्दीने हे स्थान मिळवले आहे, ते खरोखर कौतुकास्पद आहे. आजच्या तरुणांनी त्यांच्या उदाहरणातून प्रेरणा घ्यावी. सरकारी पद हे केवळ नोकरी नसून समाजसेवेचे माध्यम आहे.

# संजीवनी पॉलीटेक्निकला राज्यस्तरीय डीपेक्स प्रकल्प स्पर्धेत प्रथम बक्षिस

**● कोपरगाव । वीरभूमी–**

संजीवनी के. बी. पी. पॉलीटेक्निकने राज्यस्तरीय डिपेक्स प्रकल्प स्पर्धेत विजेतेपद पटकावले. या निमीत्ताने संजीवनी टेक्नीकल इनोव्हेशनचा राज्यपातळीवर डंका वाजला. या चुरशीच्या स्पर्धेत कृषि वर्गवारीतील गटात संजीवनीच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या 'डेव्हलपमेंट ऑफ ॲग्रीकल्चरल पीटीओ ट्रॉली फॉर मल्टी युटीलिटी अप्लिकेशन्स' या वर्किंग मॉडेलने पहिल्या क्रमांकाचे बक्षीस पटकावले. अकरा हजार रूपये रोख, सन्मान चिन्ह व प्रमाणपत्र हे या बक्षिसाचे स्वरूप आहे.



आखिल भारतीय विद्यार्थी परीषद व सृजन ट्रस्टच्या वतीने छत्रपती संभाजीनगर येथे ही स्पर्धा संपन्न झाली. महाराष्ट्र आणि गोवा राज्यांतील विविध विभागीय पातळीवरील विजेत्या स्पर्धकांनी त्यात सहभाग घेतला. शेतकऱ्यांसाठी उपयुक्त ठरणारा प्रकल्प सादर करून संजीवनीच्या विद्यार्थ्यांनी एका अर्थाने संस्थेचे संस्थापक स्व. शंकरराव कोल्हे यांची स्वप्नपूर्ती केली. या स्पर्धेत विभागीय पातळीवर निवडलेले ३२ वर्किंग मॉडेल्स सहभागी झाले होते. तृतिय वर्ष मेकॅनिकल इंजिनिअरींगच्या कृष्णा लक्ष्मीकांत गंभिरे, विवेक गजानन गायकवाड, ऋतिक बाबासाहेब गव्हाणे व चेतन दादासाहेब गायकवाड यांनी हा प्रोजेक्ट सादर केला. हे चारही विद्यार्थी शेतकरी कुटूंबातील असुन त्यांनी कृषी मालाची वाहतुक करताना येणाऱ्या समस्या अनुभवल्या आहेत. यातुन त्यांना या प्रोजेक्टची नाविन्यपुर्ण कल्पना सुचली. संस्थेचे अध्यक्ष नितिन कोल्हे यांनी व मॅनेजिंग ट्रस्टी अमित कोल्हे यांनी या विद्यार्थ्यांचा सत्कार केला. यावेळी प्राचार्य ए. आर. मिरीकर व संबंधित प्राद्यापक उपस्थित होते.

> शेतातुन शेतमाल घेवुन येणाऱ्या ट्रॅक्टरद्वारे ओढणाऱ्या ट्रालीची पकड कमी होण्याची समस्या कच्च्या रस्त्यांमुळे निर्माण होते. संजीवनीच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या ट्रॅक्टरच्या पावर टेक ऑफ (पीटीओ) शाफ्टचा वापर करून ट्रॉलीच्या चाकांना चालना देणारी पीटीओ संचालित ट्रॉली प्रस्तावित करण्यात आली आहे. त्यामुळे ट्रालीला ट्रॅक्टर एवढीच शक्ती मिळते. शेतकऱ्यांना वरदान ठरणारा हा प्रकल्प आहे. ही प्रणाली जड भार वाहतूक करताना ट्रॅक्शन सुधारते, इंधनाचा वापर आणि मजुरी कमी करते तसेच कृषी आणि ग्रामीण वापरासाठी किफायतशीर, ऊर्जा-कार्यक्षम आणि मजबूत असा पर्याय उपलब्ध करून देते.
>
> **– कृष्णा गंभिरे,** विद्यार्थी

# महिला सक्षमीकरणाचे नवे पर्व..!

**देशाच्या संसदेत १६ ते १८ एप्रिल २०२६ या कालावधीत नारी शक्ती वंदन अधिनियम या ऐतिहासिक विधेयकावर चर्चा करण्यासाठी विशेष अधिवेशन आयोजित करण्यात आले आहे. याच अधिवेशनात हा अधिनियम मंजूर होण्याची शक्यता आहे. महिलांच्या राजकीय सक्षमीकरणाला नवी दिशा देणाऱ्या या महत्त्वपूर्ण घडामोडीच्या पार्श्वभूमीवर, देशातील महिला सक्षमीकरणासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध धोरणे व योजनांचा सर्वंकष आढावा घेणारा हा लेख....**

२०२६ सालाकडे वळताना भारताच्या सामाजिक-आर्थिक पटलावर एक क्रांतिकारी स्थित्यंतर अधोरेखित होत आहे. 'महिलांचा विकास' या मर्यादित संकल्पनेकडून 'महिलांच्या नेतृत्वाखालील विकास' या दिशेने झालेला भारताचा प्रवास हा केवळ धोरणात्मक बदल नसून तो राष्ट्रनिर्मितीचा नवा पाया आहे. २०१५ मध्ये सुरू झालेल्या 'बेटी बचाओ बेटी पढाओ' या ऐतिहासिक अभियानाने गेल्या दशकात (२०१५-२०२५) लिंगभेदाच्या सामाजिक भिंती उध्वस्त करण्यात मैलाचा दगड गाठला आहे. 'विकसित भारत २०४७' च्या ध्येयप्राप्तीसाठी महिला आता केवळ योजनांच्या लाभार्थी उरल्या नसून, त्या देशाच्या अर्थव्यवस्थेचे प्रमुख इंजिन बनल्या आहेत. केंद्र सरकारच्या विविध योजनांचा समन्वय आणि प्रभावी अंमलबजावणीमुळे आजची भारतीय स्त्री खऱ्या अर्थाने 'रणरागिणी' म्हणून जागतिक स्तरावर आपला ठसा उमटवत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या शब्दांत, जेव्हाजेव्हा राष्ट्राच्या दृष्टीने महत्त्वाचा प्रश्न असतो, तेव्हातेव्हा सारा देश मतभेदांच्या पलीकडे जाऊन एकजुटीने कृती करतो. या भावनेतून 'नारी शक्ती वंदन अधिनियम' (२०२३) द्वारे महिलांना लोकसभा आणि विधानसभांमध्ये ३३ टक्के आरक्षण सुनिश्चित करणारे ऐतिहासिक पाऊल उचलले गेले. २०२६ मध्ये कॅबिनेटने या अंमलबजावणीसाठी संविधान दुरुस्ती विधेयक मंजूर केल्याने २०२९ च्या निवडणुकांपासून ही आरक्षण व्यवस्था प्रत्यक्षात येण्याची दिशा स्पष्ट झाली आहे. ही केवळ राजकीय प्रतिनिधित्वाची वाढ नाही, तर समता आणि सर्वसमावेशक लोकशाहीची नवी दिशा आहे.

कोणत्याही राष्ट्राच्या आर्थिक प्रगतीसाठी सुरक्षित व भयमुक्त वातावरण ही पहिली पूर्वअट असते. जोपर्यंत महिलांना स्वतःच्या सुरक्षिततेची खात्री वाटत नाही, तोपर्यंत त्यांचे 'लखपती दीदी' होण्याचे स्वप्न पूर्ण होऊ शकत नाही. हे ओळखूनच केंद्र सरकारने 'मिशन शक्ती' अंतर्गत 'संबल' व 'सामर्थ्य' या दोन प्रमुख उपयोजनांना अधिक सामर्थ्य दिले आहे. 'संबल' अंतर्गत 'वन स्टॉप सेंटर' ही यंत्रणा आज हिंसाचारग्रस्त महिलांसाठी एकाच छताखाली वैद्यकीय, कायदेशीर, पोलीस आणि समुपदेशन सेवा पुरवते. महिला हेल्पलाइन (१८१) आणि राष्ट्रीय आपत्कालीन सेवा (११२) मुळे संकटकाळात तात्काळ मदत उपलब्ध होते. 'नारी अदालत' द्वारे स्थानिक पातळीवर किरकोळ वाद आणि हक्कांच्या उल्लंघनाचे निवारण करण्याचे अधिकार महिलांच्या हाती देण्यात आले आहे. 'निर्भया फंड' अंतर्गत इमर्जन्सी रिस्पॉन्स सिस्टम मजबूत करण्यात आले आहे. या धोरणात्मक प्रयत्नांचे फलित म्हणजे २०१४-१५ मध्ये ९१८ असलेले 'जन्मवेळचे लिंग गुणोत्तर' २०२४-२५ पर्यंत ९२९ वर पोहोचले आहे. तसेच संस्थात्मक प्रसूतीचे प्रमाण ९७.३ टक्क्यांपर्यंत वाढणे, ही केवळ आकडेवारी नसून महिलांच्या जीवनमानात झालेल्या गुणात्मक सुधारणेचा पुरावा आहे. 'जननी सुरक्षा योजना' द्वारे दारिद्र्य रेषेखालील महिलांना संस्थात्मक प्रसूतीसाठी आर्थिक सहाय्य मिळते.

ग्रामीण भागातील महिला उद्योजकता ही आज भारतीय अर्थव्यवस्थेचा मुख्य कणा ठरत आहे. 'लखपती दीदी योजना २०२६' अंतर्गत देशातील ३ कोटी महिलांना वार्षिक किमान १ लाख रुपये उत्पन्न मिळवून देण्याचे उद्दिष्ट ग्रामीण अर्थव्यवस्थेत आमूलाग्र बदल घडवून आणत आहे. स्वयंसाहाय्यता गटांच्या माध्यमातून महिलांना कौशल्य प्रशिक्षण, ड्रोन चालवणे,




हस्तकला आणि बाजारपेठ उपलब्ध करून दिली जात आहे. 'दीनदयाळ अंत्योदय योजना – (आजीविका)' द्वारे स्वयंसहाय्यता बचतगट स्थापन करून महिलांना स्वरोजगाराची संधी मिळते. 'प्रधानमंत्री मुद्रा योजना' हा मोठा आधार ठरला आहे. 'शिशु', 'किशोर' आणि 'तरुण' या तीन श्रेणींतर्गत १० लाख रुपयांपर्यंतचे विना-तारण भांडवल उपलब्ध करून दिल्याने लाखो महिला उद्योजिका बनल्या आहेत. 'स्टँड-अप इंडिया' योजनेद्वारे अनुसूचित जाती -जमाती आणि महिला उद्योजकांना १० लाख ते १ कोटी रुपयांपर्यंत कर्ज मिळते. 'महिला शक्ती केंद्रे' आता परिपक्व पायाभूत सुविधा बनली असून, ग्रामीण महिलांमध्ये डिजिटल साक्षरता, व्यावसायिक कौशल्य आणि 'महिला ई-हाट' द्वारे ऑनलाइन उत्पादन विक्रीची संधी उपलब्ध करून देतात. 'राष्ट्रीय महिला कोष' सूक्ष्म वित्तीय सहाय्य पुरवते.

केवळ उत्पन्न मिळवणे पुरेसे नसून, मिळवलेली संपत्ती सुरक्षित ठेवणे आणि मालमत्तेवर हक्क असणे हे खऱ्या सक्षमीकरणाचे लक्षण आहे. 'महिला सन्मान बचत प्रमाणपत्र' ही योजना ७.५ टक्के आकर्षक व्याजदरासह महिलांमध्ये गुंतवणुकीची शिस्त लावते (२ लाख रुपयांपर्यंत गुंतवणूक). 'सुकन्या समृद्धी योजना' १० वर्षांखालील मुलींसाठी उच्च व्याजदर आणि करसवलतीसह दीर्घकालीन बचत सुनिश्चित करते. 'प्रधानमंत्री आवास योजना-शहरी' अंतर्गत घराची मालकी प्रौढ महिला सदस्याच्या नावे किंवा संयुक्त नावे असणे अनिवार्य केल्यामुळे 'मालमत्ता अधिकार क्रांती' झाली आहे. 'प्रधानमंत्री उज्ज्वला २.०' योजनेमुळे बीपीएल कुटुंबातील महिलांना मोफत एलपीजी कनेक्शन मिळाले, धुरापासून मुक्तता झाली आणि आरोग्य-वेळेची बचत झाली. 'प्रधानमंत्री मातृ वंदना योजना' द्वारे गर्भवती व स्तनदा मातांना पहिल्या प्रसूतीसाठी ५,००० थेट बँक खात्यात मिळते; दुसऱ्या अपत्यावेळी मुलगी झाल्यास वाढीव लाभ आणि मजुरी नुकसानीची भरपाई दिली जाते.

शिक्षण हे सक्षमीकरणाचे अंतिम शस्त्र आहे. माध्यमिक स्तरावरील मुलींच्या नावनोंदणी दरात झालेली वाढ (७५.५% वरून ८०.२% पर्यंत) हे भारतातील सुशिक्षित पिढीचे आश्वासक चित्र अधोरेखित करते. 'एकात्मिक बालविकास सेवा' अंगणवाडीद्वारे ०-६ वर्षांच्या मुलींसाठी पोषण, आरोग्य आणि पूर्व-शिक्षण पुरवते. संशोधनाच्या क्षेत्रात महिलांना समान संधी मिळावी यासाठी 'सावित्रीबाई जोतिराव फुले फेलोशिप' ही योजना पथदर्शी ठरली आहे. एकुलत्या एक मुलीसाठी पीएचडी संशोधनासाठी जेआरएफ (३१,०००/-) आणि एसआरएफ (३५,०००/-) माध्यमातून भरीव आर्थिक मदत मिळते. सामान्य प्रवर्गातील महिलांसाठी ४० वर्षे आणि राखीव प्रवर्गासाठी ४५ वर्षे वयोमर्यादा शिथिल केली आहे. विज्ञानापासून सामाजिक शास्त्रांपर्यंत सर्व क्षेत्रांत महिला संशोधक देशाच्या बौद्धिक प्रगतीला नवी दिशा देत आहेत.

२०२३ मध्ये संमत झालेल्या 'नारी शक्ती वंदन अधिनियम'ने कायदेमंडळात महिलांचे प्रतिनिधित्व वाढवण्याची ऐतिहासिक संधी निर्माण केली. २०२६ मध्ये या विधेयकाची अंमलबजावणीसाठी कायदेमंडळांच्या पटलावर मंजूर होणार आहे. २०२९ च्या निवडणुकांपासून लोकसभा आणि विधानसभांमध्ये ३३% आरक्षण प्रत्यक्षात येण्याची दिशा स्पष्ट झाली आहे. पंतप्रधान मोदी यांच्या आवाहनानुसार, महिलांसाठी जे पाऊल उचलले जात आहे, त्याला पाठिंबा देण्यासाठी सर्व पक्ष एकत्र यावेत. हा निर्णय केवळ राजकीय प्रतिनिधित्व वाढवणारा नाही, तर निर्णयप्रक्रियेत महिलांचा अनुभव आणि दृष्टिकोन जोडून प्रशासनाची गुणवत्ता वाढवणारा आहे.

२०२६ मधील महिला सक्षमीकरणाचे हे संपूर्ण चित्र सुरक्षितता (मिशन शक्ती), आर्थिक स्वावलंबन (लखपती दीदी, मुद्रा, स्टँड-अप इंडिया), मालमत्ता अधिकार (महिला सन्मान बचत प्रमाणपत्र, प्रधानमंत्री आवास योजना, उज्ज्वला) उच्च शिक्षण आणि राजकीय प्रतिनिधित्व (नारी शक्ती वंदन) या 'पंचसूत्री'वर आधारलेले आहे. सरकारी योजना आता केवळ कागदावर मर्यादित न राहता ते एक राष्ट्रव्यापी 'जनआंदोलन' झाले आहेत.

'बेटी बचाओ बेटी पढाओ' पासून सुरू झालेला हा प्रवास 'लखपती दीदी', 'महिला संशोधक' आणि 'महिला खासदार' या टप्प्यावर येऊन पोहोचला आहे. जेव्हा एखादी स्त्री आत्मनिर्भर होते, तेव्हा ती केवळ स्वतःचे कुटुंबच नाही, तर संपूर्ण समाजाचा आणि राष्ट्राचा विकास साधते. २०२६ हे वर्ष भारताच्या आत्मनिर्भरतेचे सुवर्णवर्ष ठरेल यात शंका नाही, कारण आजची भारतीय स्त्री खऱ्या अर्थाने समर्थ झाली आहे.

आता गरज आहे ती या सुवर्णसंधींचा लाभ घेऊन प्रत्येक महिलेने आपल्या स्वप्नांना क्षितिज देण्याची !

वीरभूमी
**शब्दांकन : सुरेश पाटील**
जिल्हा माहिती अधिकारी, अहिल्यानगर.

# एका महिन्यात राहता शहरातील महामार्ग पूर्ण होणार

## डॉ. सुजय विखे पाटील । राहाता शहरातील नगर-मनमाड महामार्गाची प्रत्यक्ष पाहणी करत घेतला कामाचा आढावा



**● राहाता । वीरभूमी –**
नगर-मनमाड महामार्गाचे काम अंतिम टप्प्यात असून राहता शहरातील रस्त्याचे काम येत्या एका महिन्यात पूर्ण करून पावसाळ्यापूर्वी नागरिकांच्या सेवेसाठी खुले केले जाईल, असा विश्वास भाजपा प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील यांनी व्यक्त केला.

आज सकाळी डॉ. विखे पाटील यांनी राहाता शहरातील नगर-मनमाड महामार्गाची प्रत्यक्ष पाहणी करत कामाचा आढावा घेतला. ठेकेदार व अधिकाऱ्यांसमवेत गटर्स, डिव्हायडर तसेच रस्त्याच्या रुंदीकरणाच्या कामाची सविस्तर पाहणी करण्यात आली.

ग्रामीण रुग्णालयापासून शहराच्या हद्दीपर्यंत तसेच साकुरी फाटा ते मार्केट कमिटी परिसरापर्यंतच्या कामाचा आढावा घेतला. यावेळी नगराध्यक्ष स्वाधीन गाडेकर, नगरसेवक, पदाधिकारी व ग्रामस्थ उपस्थित होते.महामार्गाच्या कामात व्यापारी वर्गाला कोणताही त्रास होऊ नये, यासाठी महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे.

राहाता नगरपंचायत हद्दीतील नगर-मनमाड रस्त्याच्या कामाची आज पाहणी करताना डॉ. सुजय विखे पाटील यांनी नागरिकांच्या सुविधेला प्राधान्य देत रस्त्याचे नियोजन करण्यात आल्याचे स्पष्ट केले. हा रस्ता सुरक्षित, सुबक आणि आधुनिक करण्यासाठी आवश्यक त्या सर्व सुधारणा केल्या जात असून, पावसाळ्यापूर्वी काम पूर्ण करण्याचा मानस आहे.

प्रारंभीच्या टप्प्यात रस्त्याच्या साईड लेव्हल्स जास्त उंच ठेवल्यामुळे परिसरातील दुकाने व व्यावसायिकांना अडचणी निर्माण होण्याची शक्यता होती. ही बाब लक्षात घेऊन केंद्र सरकारच्या माध्यमातून व पालकमंत्री ना राधाकृष्ण विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली रस्त्याच्या डिझाइनमध्ये महत्त्वपूर्ण बदल करण्यात आले. आता रस्त्याची उंची नियंत्रित ठेवून कोणत्याही व्यावसायिकाला नुकसान होणार नाही, याची काळजी घेण्यात आली आहे.

बसस्थानक परिसरातील रस्ता नव्या डिझाइननुसार विकसित केला जात असून, अनावश्यक उंची टाळून समतोल पातळी राखली जात आहे. यामुळे वाहतूक सुलभ होण्यासोबतच नागरिकांच्या सुरक्षिततेत वाढ होणार आहे. रस्त्याच्या दोन्ही बाजूंना असलेले जुने डिव्हायडर काढून टाकण्यात येणार असून, त्याऐवजी एकसंध डिव्हायडर उभारला जाणार आहे. सध्या असलेले लाईट पोल व झाडे यांचे योग्य नियोजन करून झाडांचे स्थलांतर केले जाईल. त्यामुळे रस्त्याची रुंदी आणि दृष्यता वाढेल.

तसेच, गटर लाईनपासून दोन्ही बाजूंना साधारण दोन मीटर अंतरात फुटपाथ विकसित करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. या भागात पेव्हिंग ब्लॉक बसवून नागरिकांसाठी सुरक्षित पादचारी मार्ग तयार केला जाणार आहे. यासाठी राष्ट्रीय महामार्गाच्या हद्दीत येणाऱ्या अतिक्रमणधारकांनी स्वतःहून अतिक्रमण काढून सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

राहाता शहरातील स्ट्रीट लाईट व्यवस्था इलेक्ट्रिकल पद्धतीने उभारली जाणार असून, शहराबाहेरील हायवे परिसरात सोलर स्ट्रीट लाईट बसवण्यात येणार आहेत. यामुळे वीजबिलाचा प्रश्न सुटून दीर्घकालीन सुविधा उपलब्ध होणार आहे.

या रस्त्यामुळे परिसरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार असून, रात्रीच्या वेळीही सुरक्षित आणि सुलभ प्रवासाची सोय उपलब्ध होईल. गेल्या काही काळात या रस्त्यावर झालेल्या अपघातांची दखल घेऊन महामार्गाचे काम जलद गतीने सुरू असून

कोणीही रस्त्या मध्ये बाधा आणू नये ही विनंती आहे. हा रस्ता नागरिकांच्या भल्यासाठी आहे. अनेक लोकांचे जीव ह्या मधल्या कालावधी मध्ये गेलेले आहेत आणि म्हणून या रस्त्या मध्ये जरी कोणी अडथळा निर्माण करण्याचा प्रयत्न केला तर त्यांच्यावर कायदेशीर कारवाई केली जाईल. कुठल्याही पक्षाचा असो, त्याला माफ केलं जाणार नाही असे ही डॉ. सुजय विखे पाटील यांनी यावेळी बोलताना सांगितले.

पावसाळ्यापूर्वी हा रस्ता पूर्ण करून राहाता शहरातील नागरिकांच्या सेवेत उपलब्ध करून देण्याचा संकल्प केला असून हा नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आणि शहराच्या विकासासाठी अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे.

## SPOT NEWS



### प.पु.भास्करगिरी बाबाजींच्या मातोश्रींना ज्ञानेश्वर उद्योग समूहाची आदरांजली

**● नेवासा । वीरभूमी–**
तालुक्यातील श्रीक्षेत्र देवगड संस्थान, श्री गुरुदेव दत्त पीठाचे महंत परमपूज्य गुरुवर्य भास्करगिरीजी महाराज यांच्या मातोश्री सरूबाई ज्ञानदेव पेसोडे (वय ९९ वर्षे) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. या निमत्त लोकनेते मारुतराव घुले पाटील ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन माजी आमदार डॉ.नरेंद्र घुले पाटील यांनी आदरणीय गुरुवर्य बाबाजींची सांत्वन पर भेट घेवून ज्ञानेश्वर उद्योग समूहाच्या वतीने मातोश्रींना आदरांजली अर्पण केली. तसेच माजी आ. चंद्रशेखर घुले यांनीही महंत भास्करगिरीजी महाराज यांची सांत्वनपर भेट घेत आदरांजली अर्पण केली.

### मंगळवारी सावेडीत रंगणार महात्मा फुले-डॉ. आंबेडकर संयुक्त जयंती महोत्सव

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**
सावेडी परिसरात महात्मा ज्योतीबा फुले व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंतीनिमित्त भव्य महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. महात्मा फुले व डॉ. आंबेडकर जयंती उत्सव मंडळाच्या वतीने मंगळवारी (दि. १४ एप्रिल) हा कार्यक्रम उत्साहात पार पडणार असून, नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. हा जयंती सोहळा आम्रपाली मंगल कार्यालय, गुलमोहर रोड, सावेडी येथे संध्याकाळी ४ वाजता सुरू होणार आहे. कार्यक्रमाची सुरुवात पूजन व वंदना करून होईल. त्यानंतर विविध शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवात विद्यार्थ्यांसाठी प्रश्नमंजुषा स्पर्धा, नवोदित कलाकारांसाठी गायन सादरीकरण, तसेच समाजप्रबोधनात्मक व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. या सर्व कार्यक्रमांद्वारे महात्मा फुले आणि डॉ. आंबेडकर यांच्या विचारांचा प्रसार करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. यावेळी पाटबंधारे मंत्र्यांचे स्वीय सहाय्यक राजेंद्र आंधळे हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहणार असून, ते समाजप्रबोधन आणि तरुणाईच्या भूमिकेबाबत मार्गदर्शन करणार आहेत. या कार्यक्रमासाठी मंडळाचे अध्यक्ष प्रा. निवृत्ती आरु, संपर्क प्रमुख सुधाकर जाधव, स्वागताध्यक्ष एन. एम. पवळे, तसेच सचिव सी. पी. क्षेत्रे यांनी विशेष पुढाकार घेतला आहे. त्यांनी नागरिक, विद्यार्थी आणि युवकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून महापुरुषांच्या विचारांना अभिवादन करावे, असे आवाहन केले आहे. हा जयंती सोहळा यशस्वी करण्यासाठी उपाध्यक्ष पी. पी. खंडागळे, शिरीष जाधव, सहसचिव बी. आर. सातपुते, गिरीष गायकवाड, भिमराव घोडके, राजेंद्र थोरात, डॉ. प्रताप घोडके, इंजि. निखिल आरु, डॉ. अमित पवळे, इंजि. किरण पगारे, अजय साळवे, ॲड. सुबोध जावधे, सतीष राजगुरु, अविनाश भोसले, मनेष कांबळे, अजित घोडेस्वार, डॉ. तुरुकमाने, डॉ. बी. एन. रणनवरे, के. के. जाधव, मार्शल भिंगारदिवे, मनोहर पाटोळे, संजय शिंदे, डॉ. शैलेश खंडागळे, रमेश जगताप, अर्जुन कांबळे, राजु थोरात, विजय पाटोळे आदी कार्यकर्ते परिश्रम घेत आहेत.

### कास्ट्राईब महासंघाच्या राज्य उपाध्यक्षपदी पोपट खंडागळे यांची नियुक्ती

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**
महाराष्ट्र राज्य कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघाच्या राज्य



उपाध्यक्षपदी सेवानिवृत्त कार्यकारी अभियंता पोपट खंडागळे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. महासंघाचे राज्य अध्यक्ष एन. एम. पवळे यांनी खंडागळे यांना नियुक्तीपत्र देऊन त्यांचा सत्कार केला. पोपट खंडागळे यांनी कास्ट्राईब महासंघाच्या जिल्हा उपाध्यक्षपदावर तब्बल २५ वर्षे जबाबदारी सांभाळली आहे. या काळात त्यांनी कर्मचारी हिताच्या विविध प्रश्नांवर सातत्याने आवाज उठवला. शासन दरबारी प्रलंबित असलेल्या अनेक मुद्द्यांवर पाठपुरावा करून त्यांनी कर्मचाऱ्यांना न्याय मिळवून दिला. खंडागळे यांनी सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हा परिषद येथे कार्यकारी अभियंता या महत्त्वाच्या पदावर कार्य करताना विविध विकासकामांमध्ये आपला ठसा उमटवला आहे.

## राज्यात १५ ते ३० एप्रिल दरम्यान 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जलव्यवस्थापन कृती पंधरवडा'

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**
राज्याच्या जलसंपदा विभागामार्फत १५ ते ३० एप्रिल २०२६ या कालावधीत राज्यभर 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जलव्यवस्थापन कृती पंधरवडा-२०२६' साजरा करण्यात येणार आहे. सिंचन व बिगरसिंचनाची कामे वेळेत पूर्ण करणे, विभागाच्या कामकाजाचा आढावा जनतेसमोर ठेवणे व उत्कृष्ट काम करणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांचा सत्कार करणे हा यामागील मुख्य उद्देश आहे. या पंधरवड्याचा शुभारंभ व समारोप जिल्हा स्तरावर संबंधित जिल्ह्यांच्या पालकमंत्र्यांच्या हस्ते होईल.

या पंधरवड्यादरम्यान कालवा स्वच्छता मोहीम, पाणथळ जमीन मुक्त करण्यासाठी चर योजना, आधुनिक सिंचन पद्धतीद्वारे बंदिस्त नलिका प्रणालीत रूपांतर, पाणीपट्टी वसुली व शेतकऱ्यांच्या पाणी बिलांच्या तक्रारींचे निवारण यांवर विशेष भर दिला जाणार आहे. तसेच नदीतून गाळ काढणे, पाणी वापर संस्थांचे सक्षमीकरण, घरगुती, औद्योगिक व व्यावसायिक पाणी वापराचे जललेखापरीक्षण, धरण व लाभक्षेत्रातील अनधिकृत बांधकामे हटविणे व जलसंपदा विभागाच्या मालमत्तेची स्थळ निश्चिती करण्याची कामे प्राधान्याने केली जातील. जागतिक महिला शेतकरी वर्ष असल्याने कार्यक्रमांमध्ये महिलांचा जास्तीत जास्त सहभाग नोंदवला जाईल. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जन्म त्रिशताब्दी वर्षानिमित्त २५ ते २९ एप्रिल दरम्यान गोदावरी-नर्मदा जल दिंडीचे आयोजन केले जाणार आहे.

पंधरवड्यात दररोज विविध घटकांसाठी विशेष मोहिमा, उपक्रम व जलसंपदा अदालत आयोजित केली जाईल. यामध्ये अधिकारी प्रशिक्षण, जल पुनर्भरण, शेतकरी संवाद, भूसंपादन अडचणी निराकरण, कालवा संयुक्त पाहणी, नदी प्रदूषण नियंत्रण, कृषी विभागासोबत पीक पद्धतीबाबत कार्यशाळा, महसूल विभागाच्या मदतीने जमिनीचा सातबारा उतारा अद्ययावत करणे व आपत्ती व्यवस्थापन मार्गदर्शन अशा विविध विषयांवर भर दिला जाईल. शेतकरी व गरजू नागरिकांच्या शंकांचे निरसन करून त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी प्रत्येक अभियंता कार्यालयात मदत कक्ष सुरू करण्यात येणार आहे. तसेच शासकीय योजनांची माहिती देणाऱ्या लघु चित्रफिती तयार करून तज्ज्ञांची व्याख्याने व माहितीपत्रकांद्वारे व्यापक प्रसिद्धी केली जाईल.

कार्यक्रमांच्या यशस्वी आयोजनासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी स्वतः उपस्थित राहून संनियंत्रण करावे व यात इतर प्रशासकीय विभागांचे अधिकारी, स्वयंसेवी संस्था, जलतज्ज्ञ व सर्व लोकप्रतिनिधींना आमंत्रित करावे, अशा सूचना देण्यात आल्या आहेत.

## राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीसाठी मतदान अधिकारी व कर्मचाऱ्यांचे द्वितीय प्रशिक्षण संपन्न

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**
राहुरी विधानसभा मतदारसंघ पोटनिवडणूक २०२६ च्या अनुषंगाने मतदान अधिकारी व कर्मचारी यांचे द्वितीय प्रशिक्षण दिनांक १२ व १३ एप्रिल २०२६ रोजी राहुरी येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठातील नानासाहेब पवार सभागृह व सावित्रीबाई फुले हायस्कूल येथे पार पडले. या प्रशिक्षणासाठी १ हजार ८३४ अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



प्रशिक्षण स्थळी उपस्थित सर्व कर्मचाऱ्यांना निवडणूक प्रक्रियेची सैद्धांतिक माहिती देण्यासोबतच ईव्हीएम मशीन हाताळणीचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक देण्यात आले.

या प्रशिक्षणास निवडणूक निरीक्षक (भा.प्र.से) देवानंदा रेयांग, जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. पंकज आशिया, निवडणूक निर्णय अधिकारी अनुप सिंह यादव, जिल्हा नोडल अधिकारी गौरी सावंत व सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. अमित पवार यांचे मार्गदर्शन लाभले. या प्रशिक्षणाची मुख्य जबाबदारी राहुरीच्या निवासी नायब तहसीलदार संध्या दळवी यांनी पार पाडली.

हा प्रशिक्षण कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्याकरिता निवडणूक नायब तहसीलदार बडे, महसूल नायब तहसीलदार बाचकर, सर्व मंडळ अधिकारी, राहुरीचे ग्राम महसूल अधिकारी, सर्व झोनल अधिकारी व मनुष्यबळ व्यवस्थापन कक्षातील अधिकारी व कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले.

## सामाजिक समता सप्ताहानिमित्त ज्येष्ठ नागरिक कार्यशाळा, आरोग्य व रक्तदान शिबिरांना उत्स्फूर्त प्रतिसाद

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**
दुर्लक्षित व वंचित घटकांच्या कल्याणासाठी शासनाच्या विविध योजना प्रभावीपणे तळागाळापर्यंत पोहोचविण्यासाठी समाजकल्याण विभाग सातत्याने कार्यरत आहे. या प्रयत्नांमुळे लाभार्थ्यांच्या जीवनमानात सकारात्मक बदल घडत असल्याचे प्रतिपादन जिल्हा जात पडताळणी समितीच्या अध्यक्षा तथा अपर जिल्हाधिकारी श्रीमती रेशमा माळी यांनी केले.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या वतीने आयोजित सामाजिक समता सप्ताहांतर्गत सावेडी नाका येथील पुण्यश्लोक भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवनात दि.१३ एप्रिल २०२६ रोजी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

सहायक आयुक्त (समाजकल्याण), जिल्हा जात पडताळणी समिती तसेच विविध महामंडळांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम संपन्न झाला. यामध्ये जात पडताळणी प्रमाणपत्रांचे वितरण, ज्येष्ठ नागरिक कार्यशाळा, आरोग्य शिबिर व रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमास सहायक आयुक्त प्रवीण कोरगंटीवार, जिल्हा समाजकल्याण अधिकारी देविदास कोकाटे, जिल्हा जात पडताळणी समितीचे संशोधन अधिकारी अनिल तिदमे, समाजकल्याण विभागाच्या विशेष अधिकारी श्रीमती लबडे तसेच महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघाचे प्रादेशिक अध्यक्ष शब्बीर पठाण आदी उपस्थित होते.

यावेळी सहायक आयुक्त प्रवीण कोरगंटीवार यांनी आपल्या अधिकारक्षेत्रात जिल्ह्यातील ज्येष्ठ नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जातील, अशी ग्वाही दिली.



महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघाच्या प्रादेशिक विभागाचे सचिव चौधरी पाटील यांनी सहायक आयुक्तांच्या कार्याचे कौतुक केले. आरोग्य व रक्तदान शिबिरासाठी जिल्हा रुग्णालयाच्या राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत डॉ. वैशाली बोथे व त्यांची टीम उपस्थित होती.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन समाजकल्याण निरीक्षक सकलेन सय्यद यांनी केले, तर आभार प्रदर्शन वरिष्ठ समाजकल्याण निरीक्षक श्रीमती संगिता चितळे-नांदरे यांनी केले.

# शासकीय कर्मचाऱ्यांचा विविध मागण्यांसाठी, संपावर जाण्याचा इशारा

## २१ एप्रिल पासूनचा संपाचा निर्णय कायम असून सर्वांनी जागरुक राहुन संप यशस्वी करावा : जिल्हा समन्वयक समितीचे निमंत्रण रावसाहेब निमसे

**● पाथर्डी । वीरभूमी–**
तुमच्यासाठीची कामे रात्रीतून पूर्ण होतात, आम्ही मात्र मागण्यांसाठी वर्षानुवर्षी भांडतोय.., आंदोलने करतोय.. सरकार आमच्या बरोबर बोलायला सुद्धा तयार नाही. ज्यांच्या जीवावर तुम्ही राज्य चालवता, त्या सरकारी कर्मचाऱ्यांना कमी लेखू नका. कर्मचाऱ्यांनो, कोणालाही घाबरू नका. संघटना तुमच्या पाठीशी ठाम आहे. येत्या २१ एप्रिल पासून कर्मचाऱ्यांच्या संपाचा निर्धार कायम आहे. जागरूक रहा. संप यशस्वी करा, असे आवाहन राज्य सरकारी निमसरकारी कर्मचारी मुख्याध्यापक व शिक्षक संघटना जिल्हा समन्वयक समितीचे निमंत्रण रावसाहेब निमसे यांनी केले.

तहसील कार्यालयाच्या मध्यवर्ती हॉलमध्ये शासकीय कर्मचाऱ्यांच्या येत्या २१ एप्रिल रोजी च्या नियोजित संपाच्या पार्श्वभूमीवर बैठक आयोजित करण्यात आली. अध्यक्षस्थानी सुभाष तळेकर तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून विजय पेद्राम,विजय काकडे, नायब तहसीलदार दिग्विजय पाटील, रवींद्र शेकटकर, किशोर सानप, जिल्हा कोषाध्यक्ष बाळासाहेब केदार, तलाठी संघटना अध्यक्ष वैभव केदार, उपाध्यक्ष अनिल लोहकरे, दिपक मिरपगार, प्रदीप मगर आदी उपस्थित होते.

या वेळी बोलताना निमसे म्हणाले, गेल्या २५ वर्षांपासून संघटना सनदशिर मार्गाने लढा देत आहे. शासनाने मागण्यांकडे गांभीर्याने लक्ष दिले असते तर संपाचे हत्यार उपसण्याची गरज नव्हती. कंत्राटी, अंशकालीन रोजंदारी कर्मचाऱ्यांच्या सेवा नियमित करा. सर्व रिक्त पदे प्राधान्याने भरावीत. अनुकंपा तत्त्वावर विनाअट नियुक्ती द्या. निवृत्तीचे वय ६० वर्ष करावे. चतुर्थ श्रेणी व वाहनचालक पदे भरण्या वरील बंदी उठवावी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालिका कर्मचाऱ्यांच्या सेवांतर्गत असणाऱ्या समस्यांचे निराकरण करा. अशा प्रमुख मागण्यांबरोबरच खाजगीकरण व कंत्राटीकरणास संघटनेचा विरोध राहील. सुधारित निवृत्ती वेतन योजना लागू करा. युती शासनाला सत्तेवर येऊन १५ महिने झाले. सुधारित राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना अद्याप लागू नाही. विधानसभेने मंजूर केलेली योजना राबवण्याबाबत शासनाची उदासीनता संपत नसल्याने संपाच्या माध्यमातून याकडे लक्ष वेधले जात आहे. सात वेळा लक्षवेधी आंदोलने करूनही शासनाने कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांकडे लक्ष दिले नाही. वर्षानुवर्षे कंत्राटी कर्मचाऱ्यांची सेवा होऊनही त्यांना नियमित केले जात नसल्याने त्यांचे आर्थिक शोषण होत आहे. विरोधक शिल्लक ठेवायचे नाहीत असे एकमेव धोरण असल्याने जनतेच्या प्रश्नासह कर्मचाऱ्यांचा आवाज शासन दरबारी वाढवायला कोणी राहिले नाही. कर्मचारीच आता स्वतःच्या भवितव्यासाठी रस्त्यावर उतरण्याच्या पवित्र्यात आहेत. तसा निर्णय संघटनेने जाहीर केला. संघटित व्हा. जागरूक व्हा. सकारात्मक रहा, दबाव, दडपण, बुद्धिभेद करण्याचा प्रयत्न सर्व शक्तीनिशी हाणून पाडा. शासन दोन पावले पुढे आले तर आपण एक पाऊल मागे सरकू. आपल्याच भविष्यासाठी व अस्तित्वासाठी सुरू असलेल्या लढ्यामध्ये सर्व ताकतीनिशी सहभागी व्हा. स्थानीक संघटना क्रिया शील करा. असे आवाहन त्यांनी केले.



कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन तलाठी प्रदीप मगर तर आभार उप कोषागार अधिकारी सुरेश राऊत यांनी मानले. तालुका महसूल कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष दीपक मीरपगार यांनी स्वागत केले.

वीरभूमी
हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक- महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर-४१४१०६ येथे प्रसिद्ध केले.
* संपादक- महादेव दळे, पत्ता- कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

# निवडणुकीत गाफील राहिलो तर कार्यक्रम लागतो

## डॉ. सुजय विखे पाटील । वांबोरीत भाजप महायुतीची बैठक; नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

● **राहुरी । वीरभूमी –** राहुरी–पाथर्डी–नगर विधानसभा पोटनिवडणुकीसाठी भाजप महायुतीचे उमेदवार अक्षय कर्डिले यांच्या प्रचारार्थ वांबोरी येथे माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत बैठक उत्साहात पार पडली. या बैठकीला वांबोरी परिसरातील शेतकरी, युवक आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बैठकीत मार्गदर्शन करताना डॉ. सुजय विखे पाटील म्हणाले की, निवडणुकीत गाफील राहिलो की कार्यक्रम लागतो. याचे जिवंत उदाहरण म्हणजे संगमनेर होय. या ठिकाणी सेतूवाला आमदार होतो, पण माझाही कार्यक्रम लोकांनी फिट केला. त्या निवडणुकीत कार्यकर्त्यांनी प्रामाणिकपणे काम केले, मात्र जनता ऐकायला तयार नव्हती.

ते पुढे म्हणाले की, त्या निवडणुकीत ‘हिरा’ निवडून आला. तो इतका तेजस्वी आहे की जिल्ह्यातील कुठल्याही प्रकरणात त्याचे नाव येते. आता खरातील प्रकरणातही त्याचे नाव दिसते. मला पाडले नसते तर मी संगमनेर, नेवासा, पारनेर या विधानसभा निवडणुकीत गेलो नसतो. मला पाडण्यासाठी मोठे रिंगण लावले गेले आणि ते यशस्वी झाले.

आपल्या खासदारकीच्या काळातील कामांचा उल्लेख करत ते म्हणाले, माजी खासदार असताना लोकांनी मला मोठे प्रेम दिले. त्यामागचे कारण म्हणजे विकासाची कामे.

वांबोरी परिसराच्या विकासाबाबत त्यांनी सांगितले की, येथील युवकांसाठी क्रीडा संकुल उभारण्यात येणार असून या माध्यमातून चांगले खेळाडू तयार होतील. वांबोरी चारी टप्पा एकचे नूतनीकरण पूर्ण झाले असून टप्पा दोनचे कामही मार्गी लावले जाणार आहे. तसेच वांबोरी येथील जुनी शासकीय चारी सुरू करण्यासाठी प्रयत्न केले जातील. या भागातील शेती सिंचनाखाली आणण्याचेही नियोजन आहे.

ते पुढे म्हणाले, आम्ही खोटे आश्वासन देत नाही. गेली चाळीस वर्षे साकळाई पाणी योजना होणार असे सांगितले जात होते, मात्र ते काम आम्ही पूर्ण केले. पाणी हे नागरिकांचे मत परिवर्तन घडवते. पुढील पन्नास वर्षे नगर समृद्ध राहील.

राजकीय परिस्थितीवर भाष्य करताना ते म्हणाले की, राहुरी तालुक्याला विकासाच्या दृष्टीने पुढे न्यायचे आहे. माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांनी निवडणूक न लढवण्याचा घेतलेला निर्णय सकारात्मक आहे, त्याबद्दल त्यांचे आभार. राहुरीतील अनेक वर्षांचा संघर्ष आता थांबला आहे. संघर्षातून अर्थकारण वाढते, पण विकास होत नाही.

ते पुढे म्हणाले की, स्वर्गीय आमदार शिवाजीराव कर्डिले यांनी राहुरी तालुक्यात मोठ्या प्रमाणावर विकासकामे केली. त्या कामांची परतफेड करण्याची जबाबदारी आपली आहे. आपला पक्ष एक नंबरचा असून अक्षय कर्डिले यांना एक नंबरनेच आमदार करायचे आहे.

साखर उद्योगाबाबत त्यांनी सांगितले की, १२ हजार टन क्षमतेचा कारखाना सुरू करण्यात आला असून त्यामुळे कोणाचाही ऊस शिल्लक राहणार नाही.

ते पुढे म्हणाले, पुढील काळात अहिल्यानगर जिल्ह्यात तीन लोकसभा मतदारसंघ होतील. आज सकाळी सात वाजल्यापासून नगर–मनमाड रस्त्यावर उभे राहून काम सुरू केले असून या कामासाठी तीन किलोमीटर पायी चाललो.

शेवटी त्यांनी सांगितले की, राजकारण हे एका दिवसाचे नसून लोकांच्या जीवनात बदल घडवण्याचे माध्यम आहे. माणसे ओळखण्यासाठी गुण असावे लागतात. वांबोरीत आलो की सुभाष पाटील हे नाव पुढे येते. वांबोरी परिसरातील नागरिकांनी अक्षय कर्डिले यांना मोठ्या मताधिक्याने आमदार करण्याचा निर्धार केला आहे.

यावेळी ज्येष्ठ नेते सुभाष पाटील म्हणाले की, स्वर्गीय आमदार अरुण काका जगताप यांच्या माध्यमातून माझी आणि स्वर्गीय आमदार शिवाजीराव कर्डिले यांची मैत्री झाली. कर्डिले यांची काम करणाऱ्या माणसाची ओळख आहे. त्यांच्या कामाला मते देऊन अक्षय कर्डिले यांना आमदार करायचे आहे.



ते पुढे म्हणाले, वांबोरी चारीचे शिल्पकार कै. बाळासाहेब विखे पाटील आहेत. डॉ. सुजय विखे हे फक्त डॉ. नसून न्युरोसर्जन आहेत. लोकांच्या डोक्यात काय चालते हे त्यांना समजते. काम करणाऱ्या लोकांकडेच जनता जाते आणि लोकदरबारात प्रश्न मार्गी लागतात, त्यामुळेच गर्दी होते.

उमेदवार अक्षय कर्डिले यांनी आपल्या भाषणात सांगितले की, माझ्या वडिलांचे विकासाचे स्वप्न पूर्ण करायचे आहे. सर्वांना सोबत घेऊन मतदारसंघात विकासाची गंगा आणायची आहे. त्यामुळे मतदारांनी विकास कामांसाठी मतदान करावे.

या बैठकीला उमेदवार अक्षय कर्डिले, ज्येष्ठ नेते सुभाष पाटील, भाजप तालुकाध्यक्ष सुरेश बानकर, सुखदेव कुसमुडे, विक्रम तांबे, हरिभाऊ कर्डिले, उदयसिंह पाटील, प्रभाकर हरिश्चंद्र, किरण ससाणे, भाऊसाहेब साठे, प्रशांत नवले, अशोक उंडे, ज्ञानदेव शिंदे, सुरेश सुंबे यांसह वांबोरी परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

वांबोरीतील या बैठकीतून भाजप महायुतीच्या प्रचाराला जोरदार चालना मिळाली असून, अक्षय कर्डिले यांच्या उमेदवारीभोवती जनसमर्थन मोठ्या प्रमाणात एकवटत असल्याचे स्पष्ट चित्र दिसून आले.

# आ.आशुतोष काळेंच्या सूचनेनुसार सात नंबर पाणी मागणी अर्ज दाखल करण्यासाठी २० एप्रिल पर्यंत मुदतवाढ

● **कोपरगाव । वीरभूमी –** उन्हाळी हंगाम २०२६ साठी गोदावरी कालव्याच्या लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांना पाटबंधारे विभागाकडून पाणी मागणी अर्ज भरण्यासाठी २७ मार्च ही अंतिम मुदत देण्यात आली होती. मात्र अनेक शेतकरी या मुदतीत अर्ज भरू शकले नव्हते. सध्या उन्हाची तीव्रता प्रचंड वाढली असून उभ्या पिकांना, फळबागांना आणि चारा पिकांना पाण्याची नितांत गरज भासणार आहे. जर या शेतकऱ्यांना पाणी मागणी अर्ज भरता आले नसते तर ते उन्हाळी सिंचन आवर्तनापासून वंचित राहिले असते आणि त्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले असते. ही अडचण ओळखून आमदार आशुतोष काळे यांनी राहिलेल्या शेतकऱ्यांना पाणी मागणी अर्ज भरण्यासाठी पाटबंधारे विभागाला मुदतवाढ देण्याबाबत सूचना केल्या होत्या.



त्या सूचनेनुसार पाटबंधारे विभागाने सात नंबर अर्ज भरण्यासाठी २० एप्रिलपर्यंत मुदतवाढ दिली आहे. त्यामुळे ज्या शेतकऱ्यांनी सात नंबर पाणी मागणी अर्ज भरले नाही. त्या शेतकऱ्यांनी या संधीचा फायदा घेऊन आपले पाणी मागणी अर्ज दिलेल्या मुदतीच्या आत पाटबंधारे विभागाच्या संबंधित कार्यालयाकडे जमा करावेत असे आवाहन आमदार आशुतोष काळे यांनी केले आहे.

त्यामुळे ज्या शेतकऱ्यांचे पाणी मागणी अर्ज भरणे बाकी होते त्या शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण पसरले असून त्या शेतकऱ्यांनी आमदार आशुतोष काळे यांचे आभार मानले आहे.

# अकोले तालुका माहेश्वरी सभेच्या अध्यक्षपदी निरज मुंदडा, तर मंत्रीपदी प्रसाद राठी बिनविरोध

● **अकोले । वीरभूमी –** येथील तालुका माहेश्वरी सभेच्या सन २०२६ ते २०२९ च्या कार्यकारिणीची निवड करण्यात आली. यामध्ये अध्यक्षपदी निरज मुंदडा तर मंत्रीपदी प्रसाद राठी यांची बिनविरोध निवड झाली.

विठ्ठलदास भुतडा हे निवडणूक निर्णय अधिकारी होते. तर त्यांना विजय सारडा व विशाल राठी यांनी सहाय्य केले. बिनविरोध निवड झालेली कार्यकारणी पुढीलप्रमाणे – अध्यक्ष – निरज मुंदडा, मंत्री – प्रसाद राठी, उपाध्यक्ष – चेतन बुब, कोषाध्यक्ष – गौतम मुंदडा, संघटन मंत्री – सर्वेश डांगरा, सह सचिव– अल्पेश सारडा, जिल्हा प्रतिनिधी– सोमनाथ मुंदडा व





रामनिवास राठी, पदेन – विजय सारडा व विशाल राठी, तर कार्यकारणी सदस्य सुरेशकुमार करवा यांची निवड करण्यात आली. नवनिर्वाचित सर्व पदाधिकाऱ्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

अध्यक्ष निरज मुंदडा व त्यांचे सहकारी निश्चितच माहेश्वरी समाज बांधवांच्या विश्वासास पात्र असेच भरीव काम करतील असा विश्वासही प्रदेश जनसंपर्क मंत्री अजय जाजू यांनी व्यक्त केला. यावेळी विजय राठी, सतीश बुब, रमेशचंद्र सारडा, श्यामसुंदर मुंदडा, विजय राठी, शुभम मणियार, धनंजय जाजू, पंकज बुब, आनंद मुंदडा आदी मान्यवर उपस्थित होते.

# नागरीकांच्या आरोग्याशी खेळू नका, तातडीने नाले सफाई मोहीम सुरु करा : शैलेश साबळे

● **कोपरगाव । वीरभूमी –** शहरातील अनेक प्रभागांमध्ये



नाल्यांची नियमित स्वच्छता होत नसल्याने नाल्यांची अवस्था अत्यंत बिकट झाली आहे. ठिकठिकाणी सांडपाणी साचल्यामुळे परिसरात प्रचंड दुर्गंधी पसरली असून नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. दोन महिन्यांनी सुरु होणाऱ्या पावसाळ्यात शहरात पाणी साचून नागरिकांचे आरोग्य धोक्यात येऊ शकते. त्यामुळे नागरीकांच्या आरोग्याशी खेळू नका तातडीने नालेसफाई मोहीम सुरु करा अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकर्ते शैलेश साबळे यांनी कोपरगाव नगरपरिषद प्रशासनाला केली आहे.

शहरातील विविध प्रभागातील नाल्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर गाळ आणि कचरा साचला असल्याने सांडपाणी वाहून जाण्यास अडथळा निर्माण झाला आहे. त्यामुळे अनेक ठिकाणी गटारींचे दुर्गंधीयुक्त पाणी रस्त्यावर येत आहे. या अस्वच्छतेमुळे डासांचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणावर वाढला असून दुर्गंधीयुक्त पाण्याचा नागरिकांना त्रास होत आहे. यामुळे शहरात नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला असून मोठ्या प्रमाणावर रोगराई आणि साथीचे आजार पसरण्याचा धोका निर्माण झाला आहे.

नाले सफाई करतांना केवळ वरवरची स्वच्छता न करता शहरातील छोटे–मोठे नाले आणि मुख्य गटारीतील गाळ पूर्णपणे बाहेर काढणे गरजेचे आहे. बाहेर काढलेल्या गाळाची योग्य विल्हेवाट लावावी जेणेकरून तो पुन्हा नाल्यात जाणार नाही आणि नाला तुंबणार नाही. शहरातील स्वच्छतेचा प्रश्न गंभीर होत चालला असून पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर नगरपालिका प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देणे गरजेचे आहे. शहरातील नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित प्रश्नांना प्राधान्य देऊन नियोजनबद्ध काम करणे आवश्यक असून तुंबलेल्या नाल्यांचा आणि साचलेल्या सांडपाण्याचा त्रास नागरिकांना सहन करावा लागत असून त्यामुळे तातडीने नालेसफाई मोहीम सुरु करावी अशी मागणी शैलेश साबळे यांनी केली आहे.

# महिलांच्या सुरक्षेसाठी ‘वन स्टॉप सेंटर’ ठरतेय मोठा आधार

## केंद्राच्या माध्यमातून १ हजार ४११ महिलांना मिळाली मदत

● **अहिल्यानगर । वीरभूमी–** महिलांवरील अत्याचार, कौटुंबिक हिंसाचार, लैंगिक छळ तसेच संकटग्रस्त महिलांना तात्काळ मदत मिळावी या उद्देशाने शासकीय रुग्णालयाच्या परिसरात सुरू करण्यात आलेले ‘वन स्टॉप सेंटर’ प्रभावीपणे कार्यरत आहे. अनेक पीडित महिलांसाठी हे केंद्र खऱ्या अर्थाने आधारवड ठरत आहे.

जिल्हा प्रशासनाच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत असलेल्या या केंद्राने गेल्या काही वर्षांत उल्लेखनीय कामगिरी केली आहे. आतापर्यंत जिल्ह्यातील सुमारे १,४११ महिलांना या सेंटरच्या माध्यमातून विविध प्रकारचे संरक्षण आणि साहाय्य देण्यात आले असल्याची माहिती केंद्राच्या प्रशासक श्रीमती शबाना शेख यांनी दिली.

महिला व बाल विकास विभागांतर्गत कार्यरत असलेल्या या केंद्रामार्फत पीडित महिलांना एकाच छताखाली सर्व आवश्यक सेवा उपलब्ध करून दिल्या जात आहेत. यामध्ये प्रामुख्याने वैद्यकीय मदत, पोलीस साहाय्य, कायदेशीर सल्ला, तज्ज्ञांकडून समुपदेशन, तसेच तात्पुरती निवास व्यवस्था यांचा समावेश आहे. कौटुंबिक वाद, छळ व मानसिक ताण यांसारख्या समस्यांवर उपाय म्हणून तज्ज्ञ समुपदेशकांकडून योग्य मार्गदर्शन दिले जात असल्याने अनेक महिलांना आत्मविश्वासाने जगण्यासाठी नवी उभारी मिळत आहे.

यासोबतच महिलांना त्यांच्या हक्कांबाबत जागरूक करण्यासाठी प्रशासन विविध उपक्रम राबवत आहे. शाळा, महाविद्यालये व ग्रामीण भागांत विशेष मोहिमा आयोजित करून महिलांना कायदेशीर हक्क, हेल्पलाइन क्रमांक आणि उपलब्ध शासकीय सेवांची माहिती दिली जाते. संकटात सापडलेल्या महिलांसाठी हे केंद्र अहोरात्र (२४ तास) कार्यरत असून, तातडीच्या परिस्थितीत महिलांनी १८१ या हेल्पलाइन क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

या केंद्रामार्फत महिलांना तात्काळ वैद्यकीय मदत आणि पोलीस साहाय्य उपलब्ध करून दिले जाते. तसेच, मोफत कायदेशीर सल्ला देऊन तक्रार नोंदणीस मदत केली जाते. मानसिक ताणातून बाहेर पडण्यासाठी मानसोपचार व तज्ज्ञांकडून समुपदेशनाची सुविधा




दिली जाते. याशिवाय, गरज भासल्यास महिलांसाठी तात्पुरती सुरक्षित निवास व्यवस्था देखील उपलब्ध करून दिली जाते.

महिलांच्या सक्षमीकरणासाठी आणि सुरक्षिततेसाठी शासनाने सुरू केलेल्या या उपक्रमाला जिल्ह्यातून सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे.

# पेडगाव किल्ल्याच्या संवर्धनासाठी ग्रामस्थांनी पुढे यावे

## वास्तुविशारद काजल दरेकर–जंजिरे यांचे आवाहन । किल्ला आता राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर चर्चिला जाऊ लागला

● **श्रीगोंदा । वीरभूमी–** श्रीगोंदा तालुक्यातील पेडगावचा ‘धर्मवीर गड’ हा किल्ला भावी पिढ्यांसाठी इतिहासाची साक्ष व प्रेरणा देणारा महत्त्वाचा वारसा आहे. त्यामुळे किल्ल्याची दुरुस्ती, सुशोभीकरण व संवर्धनासाठी पेडगाव ग्रामस्थांनी पुढाकार घेऊन राजकीय व शासकीय पातळीवर प्रयत्न करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन प्रसिद्ध वास्तुविशारद काजल दरेकर–जंजिरे यांनी केले.

काजल दरेकर–जंजिरे या पेडगावचे सुपुत्र व सहायक पोलीस आयुक्त महेश ईश्वर जंजिरे यांच्या पत्नी आहेत. त्या पुण्यातील नामांकित वास्तुविशारद असून लँडस्केप हा त्यांच्या विशेष आवडीचा विषय आहे. आपल्या पेडगाव गावातील साडेतीनशे वर्षांच्या इतिहासाचा साक्षीदार असलेल्या धर्मवीर गड (पेडगाव किल्ला) संदर्भात त्यांनी दिल्ली येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय परिषदेत शोधनिबंध सादर करत सविस्तर मांडणी केली. त्यामुळे आधीपासून प्रसिद्ध असलेला हा किल्ला आता राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर चर्चिला जाऊ लागला आहे.

या उल्लेखनीय कामगिरीबद्दल पेडगाव ग्रामस्थांनी भैरवनाथ मंदिराच्या पटांगणात काजल दरेकर–जंजिरे यांचा सत्कार सोहळा आयोजित केला होता. यावेळी सरपंच इरफान पिरजादे व माजी उपसरपंच अशोक गोधडे यांच्या हस्ते त्यांना फेटा बांधून, शाल व श्रीफळ देऊन गौरविण्यात आले.

या कार्यक्रमाला ज्येष्ठ नेते हरिदास शिर्के, पंचायत समितीचे माजी उपसभापती गणेश झिटे, माजी सरपंच रोहिदास पवार, माजी सरपंच बबनराव कणसे, प्रतिभाताई झिटे, बांधकाम व्यावसायिक ईश्वर जंजिरे, सामाजिक कार्यकर्ते सुरेश जंजिरे, महिला बचत गटाच्या नेत्या सुनीता जंजिरे यांच्यासह महिला, युवक, विद्यार्थिनी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सत्काराला उत्तर देताना काजल दरेकर–जंजिरे यांनी आपल्या शोधनिबंधातील विविध मुद्द्यांचा उहापोह करत किल्ल्याबाबत अनेकांना माहीत नसलेले ऐतिहासिक पैलू उलगडून सांगितले. त्यांच्या सादरीकरणामुळे



किल्ल्याची महती आणि माहिती जगभर पोहोचली आहे.

जंजिरे कुटुंबाप्रमाणेच गावाची सेवा करण्याची काजल यांची वृत्ती दिसून येते. त्यामुळे काजल व त्यांचे पती महेश जंजिरे हे ग्रामस्थांच्या कौतुकास पात्र ठरत असल्याचे गौरवोद्गार सरपंच इरफान पिरजादे यांनी काढले. काजल यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत ग्रामस्थ संघटितपणे पेडगाव किल्ल्याच्या दुरुस्ती, सुशोभीकरण व जतनासाठी पुढाकार घेतील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

गावाप्रती असलेल्या प्रेमभावनेतून काजल दरेकर–जंजिरे यांनी केलेल्या प्रभावी सादरीकरणाबद्दल वयोवृद्ध, महिला, युवक व विद्यार्थ्यांनी त्यांचे प्रत्यक्ष भेटून कौतुक केले.

### अगं बया! आपली काजल कशी धाडधाड बोलतेय बघा की..!

■ कार्यक्रमात गावच्या सूनबाई असलेल्या काजल यांनी सत्काराला उत्तर देताना एखाद्या निष्णात वक्त्याप्रमाणे मुद्देसूद व प्रभावी मांडणी करत छोटेखानी भाषण केले. त्यांच्या वक्तृत्वाने ज्येष्ठ मंडळींसह ग्रामस्थ प्रभावित झाले. विशेषतः महिलांना त्यांच्या भाषणाचे मोठे अप्रूप वाटले. त्या एकमेकींशी कुजबुजत, अगं बया! आपली काजल कशी धाडधाड बोलतेय बघा की..! असे म्हणत होत्या. इतर उपस्थितांमध्येही काजल यांच्या मार्गदर्शनपर भाषणाची आणि त्यांनी दिलेल्या पेडगाव किल्ल्याबाबतच्या माहितीची चर्चाच रंगली होती.